# टीसीआयची तिसऱ्या तिमाहीत दमदार कामगिरी

**पुणे (प्रतिनिधी) :** ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (टीसीआय) या भारतातील आघाडीच्या एकात्मिक पुरवठा साखळी व लॉजिस्टिक्स सोल्युशन्स प्रोवायडर कंपनीने आज ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाहीचे वित्तीय निकाल जाहीर केले.

टीसीआयने आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत संचालनातून ७५९ कोटी रु उत्पन्न मिळवले आहे ज्यात मागील वर्षाच्या तुलनेत ६.२% वाढ झाली आहे. कंपनीचा कर पश्चात नफा ७८ कोटी रुपये झाला असून आर्थिक वर्ष २०२१मधील तिसऱ्या तिमाहीतील ४० कोटी रुपयांची तुलना करता यात ९४% वाढ झाली आहे. कंपनीचे ईबीटीडीए आर्थिक वर्ष २०२१च्या तिसऱ्या तिमाहीतील ८४ कोटी रुपयांच्या तुलनेत या तिमाहीत ११४ कोटी रुपये झाले आहे. कंपनीचे ईबीआयटीडीए मार्जिन १४.९ टक्के झाले आहे जे आर्थिक वर्ष २०२१च्या तिसऱ्या तिमाहीत ११.६ टक्के होते. टीसीआयने या आर्थिक वर्षात संचालनातून २३५९ कोटी रु उत्पन्न मिळवले आहे ज्यात मागील वर्षाच्या तुलनेत २३.५% वाढ झाली आहे.